सं.फौ.ख.क्र. ६२/२०२३
सरकार वि. निखिल
निशाणी क्र.१९

**सरकारतर्फे साक्षदार क्रमांक २ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नाव – भुमीराज घनश्यामजी उके

वय – ३८ वर्ष, व्यवसाय – काही नाही

राहणार – गणेश नगर, कन्हान, ता.पारशिवणी, जिल्हा नागपूर

**<u>सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता एस.व्ही. रामटेके यांच्यातर्फे</u>**

१. घटना दिनांक ११/०९/२०२२ रोजी संध्याकाळी ६.३० ते ७.०० वाजताच्या दरम्यान तारसा रोड वरील चौकात घडली होती. त्यावेळी मी, माझी पत्नी मेघा व मुलगा वेदांत असे माझी स्कुटी घेऊन रोड क्रॉस करण्यसाठी साईडला उभे होतो. तसेच तेथे माझा मोठा भाऊ श्रीकृष्ण व माझा पुतण्या सागर हे सुध्दा तेथे उभे होते. त्यावेळी एक मोटरसायकल कामठी कडून टेकाडी कडे जात होती. त्या मोटरसायकलने माझ्या स्कुटीला समोरुन धडक मारली. त्या मोटरसायकल चा क्रमांक एमएच–४०–ए.एल.–६९२७ असा होता. धडक मुळे मी खाली पडलो, मी उठण्याचा प्रयत्न केला परंतु मला उठता आले नाही कारण माझा पाय फ्रॅक्चर झाला होता. माझी पत्नी व मुलगा देखील खाली पडले परंतु त्यांना मार लागला नाही. तेथे जमलेल्या लोकांनी मोटरसायकल चालकाला पकडून ठेवले व काही लोकांनी मला उचलून साईडला केले. त्यानंतर माझ्या भावाने एक ऑटो बोलावून आशा हॉस्पीटल येथे नेले. मोटरसायकल चालकाला बघितल्यास मी ओळखू शकतो. आज रोजी तो न्यायालयात हजर नाही. त्यादिवशी पोलीस हॉस्पीटल ला आले व माझे बयान घेतले. आता मला फिर्याद दाखविण्यात आली. ती तीच असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी २०** देण्यात येते. पोलीसांनी माझे पुन्हा बयान घेतले होते. आता मला दुसरी फिर्याद दाखविण्यात आली. ती तीच असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी २१** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**

**<u>उलटतपास आरोपी तर्फे वकील रिना गणवीर यांच्यातर्फे.</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की मी पोलीस स्टेशनला कुठलीही तक्रार दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी माझे बयान घेतले हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की ट्रीपल सीट मोटरसायकल चालविणे कायदयाने गुन्हा आहे. पोलीसांना बयान देतांना ' मी, माझी पत्नी मेघा व मुलगा वेदांत असे माझी स्कुटी घेऊन रोड क्रॉस करण्यसाठी साईडला उभे होतो. तसेच तेथे माझा मोठा भाऊ श्रीकृष्ण व माझा पुतण्या सागर हे सुध्दा तेथे उभे होते, तसेच तेथे जमलेल्या लोकांनी मोटरसायकल चालकाला पकडून ठेवले व काही लोकांनी मला उचलून साईडला केले’ या बाबी सांगितली होत्या. सदर बाबी माझ्या दोन्ही जबाबात नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळ हे जबलपूर राष्ट्रीय महामार्ग आहे व तेथे वाहनाची सारखी ये–जा सुरु असते, तसेच तेथे कुठल्याही प्रकारचा सिंग्नल नाही. हे म्हणणे खरे नाही की घटनेच्या वेळी माझा तोल जाऊन मी खाली पडलो. हे म्हणणे खरे नाही की माझ्या विरुध्द कायदेशीर कारवाई होऊ नये म्हणून मी आरोपी विरुध्द खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

Digitally signed by RAJESH RAMESHRAO SHEREKAR
Date: 2024.07.05 15:43:31 +0530

**(रा.र. शेरेकर)**

ठिकाण –कामठी

दिनांक –०५/०७/२०२४ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र. ३, कामठी.